44

<u>**फिर्याद**</u>

MIDC पो.स्टे.,जळगाव
दि.०७.०१.२०२५

**मी सुनिल नामदेव परदेशी, वय—२६ वर्षे, व्यवसाय शिक्षण, रा.रायपुर, ता.जि.जळगांव. मो.नं. ८२०८७८७१३८.**

समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरिल ठिकाणी वडील नामदेव परदेशी,आई सरलाबाई,भाऊ अनिल अशांसह राहतो व शिक्षण करतो. मौजे रायपुर,ता.जि. जळगाव येथे भुखंड नं.५२ चे एकुण क्षेत्र ३.४१.६० चौ.मी. असून स्लॅब रजिस्टर प्रमाणे ७/१२ उताऱ्यावर आई, वडील व भाऊ अनिल याचे नाव लावुन मिळावे यासाठी मी आज दि.०७.०१.२०२५ रोजी माझा चुलत भाऊ मनोज परदेशी,रा.रायपुर ता.जि.जळगाव याचेसह कुसुंबा खुर्द,ता.जि.जळगाव येथील तलाठी कार्यालयात जावुन तलाठी श्री.भोई यांना भेटुन अर्ज व कागदपत्रे दाखवले होते. तेव्हा त्यांनी सदर कामासाठी माझेकडे ५ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. सदर लाचमागणी प्रकारा बाबत मी दि.०७.०१.२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे पोलीस निरीक्षक स्मिता नवघरे यांचेकडे तक्रार लिहुन दिली होती.

त्यानंतर मी वर प्रमाणे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचमागणी पडताळणी करणेकामी नवघरे मॅडम यांचे सुचने प्रमाणे व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझेकडे देवुन मला तलाठी श्री. भोई यांची भेट घेण्यासाठी कुसुंबा खुर्द,तलाठी कार्यालय येथे पंच नं.०१ श्री.सोनवणे यांचेसह माझ्या मोटर सायकलने कुसुंबा चिंचोली रस्त्यावर असलेल्या शिव पार्वती महादेव मंदिरा जवळुन रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच नं.१ श्री.सोनवणे असे कुसुंबा तलाठी कार्यालयात जावुन तलाठी श्री.भोई यांना भेटलो. तेव्हा त्यांचेत व माझेत भुखंड नं.५२ चे एकुण क्षेत्र ३. ४१.६० चौ.मी. असून स्लॅब रजिस्टर प्रमाणे ७/१२ उताऱ्यावर माझे आई, वडील व भाऊ अनिल यांचे नाव लावुन देण्याचे काम विषयी चर्चा झाली.

परंतु त्यांना माझे कामाचा विषय समजला नाही. म्हणुन त्यांनी मला ''भुसंपादन अधिकारी पुर्नवसन शाखा यांचेकडे जा'' असे सांगुन परत करुन दिले होते. त्यानंतर ठरल्या प्रमाणे मी पुन्हा सापळा पथका जवळ परत आलो व सापळा अधिकारी नवघरे मॅडम यांना घडलेली घटना सांगीतली. त्यानंतर मी त्यांना ''माझा चुलत भाऊ मनोज परदेशी यास सोबत नेवुन तलाठी श्री. भोई यांची भेट घेवुन माझे प्रकरणा बाबत चर्चा करतो तेव्हा त्यांना माझे कामाचा विषय लक्षात येईल'' असे सांगीतले. तेव्हा त्यांनी माझे सोबत भाऊ तलाठी श्री.भोई यांना भेटण्यासाठी पाठवण्याचे ठरवले.

त्यानंतर नवघरे मॅडम यांचे सुचने प्रमाणे पुन्हा व्हाईस रेकॉर्डर चालु करून, माझे शर्टचे आतील बाजुस गळयात अडकावुन देण्यात आले. त्यानंतर नवघरे मॅडम यांनी मला,भाऊ मनोज परदेशी, व पंच श्री.सोनवणे अशांना माझे मोटर सायकलने तलाठी श्री.भोई यांची भेट घेण्यासाठी कुसुंबा खुर्द,तलाठी कार्यालय येथे पाठवले होते. तेव्हा आम्ही सदर ठिकाणी जावुन त्यांची भेट घेतली. तेव्हा भाऊ मनोज परदेशी याने तलाठी श्री.भोई यांना ''यापुर्वी देखील स्लॅब रजिस्टर प्रमाणे ७/१२ उताऱ्यावर इतर लोकांची नावे लावुन दिलेली आहेत, नावे लावुन देणे हा विषय भुसंपादनचा नसुन तुमच्या कडील आहे'' असे म्हटला. तेव्हा तलाठी श्री.भोई बोलत बोलत त्यांचे कार्यालया बाहेर आले.

त्यानंतर तलाठी श्री.भोई यांनी मला ''तुला काय द्यायची ईच्छा आहे'' असे विचारले. तेव्हा मी त्यांना ''आप्पा तुम्ही सांगा फक्त लवकर झाले पाहीजे'' असे म्हटलो असता त्यांनी ''४—५ पर्यंत फायनल करा'' असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना ''जास्त होता आप्पा'' असे म्हटलो असता त्यांनी ''३ दे जो मी करुन देईल काम'' असे सांगीतले. त्यावर मी त्यांना ''किती ३ हजार'' असे म्हणालो असता त्यांनी मला ''हळु बोलत जा ना'' असे बोलुन सदर लाच रक्कम माझे ओळखीचा सचिन सोनवणे,रा.धानवड याचेकडे देण्यास सांगीतली. तेव्हा भाऊ मनोज परदेशी याने त्यांना ''त्याचे कडे देणार नाही त्याचे आणि आमचे जमत नाही असे

सांगीतले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. व घडलेली हकीकत सापळा पथकास सांगितली. त्यानंतर सापळा पथकाने माझे, भाऊ मनोज परदेशी व तलाठी श्री.भोई यांचेमधील संभाषण ऐकुण लाच मागणी बाबत खात्री केली होती.

त्यानंतर पोलीस निरीक्षक नवघरे मॅडम यांनी मला, पंच श्री.सोनवणे व सापळा पथकास पुढील सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी माझे जवळील ३,०००/—रूपये (त्यात ५०० रुपये दराच्या ०६ नोटा) सापळा पथकाकडे दिल्या. पंचासमक्ष सदर नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन घेण्यात आले. व सदर नोटांना अॅथ्रासिन पावडर लावुन, त्या माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन देण्यात आल्या.

त्यानंतर नवघरे मॅडम यांचे सुचने प्रमाणे व्हाईस रेकॉर्डर चालु करून, माझे शर्टचे आतील बाजुस गळयात अडकावुन देण्यात आले. त्यानंतर नवघरे मॅडम यांनी मला व पंच श्री. सोनवणे अशांना माझे मोटर सायकलने तलाठी श्री.भोई यांची भेट घेण्यासाठी कुसुंबा तलाठी कार्यालयात पाठवले. आम्ही सदर ठिकाणी गेल्यानंतर ते फोनवर बोलत होते. तेव्हा तेथे हजर असलेल्या महसुल सेवक गणेश घुगे यांनी मला काय काम आहे? असे विचारले मी त्यांना आप्पांशी काम आहे त्यांना पाठवा असे म्हटलो. त्यानंतर तलाठी श्री.भोई फोनवर बोलत बोलत बाहेर आले. तेव्हा मी त्यांना ''तुम्ही सांगीतले प्रमाणे ३ दिले'' असे बोलुन, माझे शर्टच्या डाव्या खिश्यातुन ३ हजार रुपये लाच रक्कम काढुन त्यांचे समोर धरली. सदरची लाच रक्कम त्यांनी डाव्या हातात स्विकारुन त्यांचे पॅन्टच्या मागील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन घेतली व ते पुन्हा तलाठी कार्यालयात गेले. त्यानंतर ठरल्याप्रमाणे मी सापळा पथकास खिश्यातील हात रुमाल बाहेर काढुन तलाठी श्री.भोई यांनी लाच रक्कम स्विकारले बाबत ईशारा केला. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना कुसुंबा तलाठी कार्यालयातच लाच रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेवुन त्यांचे पुर्ण नाव,पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव श्री.नितीन शेषराव भोई,वय ३१ वर्षे, तलाठी,रा प्रतिभा गॅस एजन्सी, कालंका माता मंदिरा जवळ,जळगाव असे सांगीतले. तसा संपुर्ण सापळा कार्यवाहीचा पंचनामा करण्यात आला आहे.

तरी लोकसेवक श्री.नितीन शेषराव भोई,वय ३१ वर्षे, तलाठी,रा प्रतिभा गॅस एजन्सी, कालंका माता मंदिरा जवळ, जळगाव यांनी मौजे रायपुर येथील भुखंड नं.५२ चे एकुण ३.४१. ६० चौ.मी. क्षेत्राचे ७/१२ उताऱ्यावर स्लॅब रजिस्टर प्रमाणे माझे आई, वडील व भाऊ अनिल याचे नाव लावुन देण्याचे मोबदल्यात माझेकडे प्रथम ५ हजार व तडजोडीअंती ३ हजार रुपये लाच रकमेची मागणी करुन, सदर लाच रक्कम आज दि.०७.०१.२०२५ रोजी १६.५५ वा.चे सुमारास कुसुंबा खुर्द तलाठी कार्यालयात पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन माझी फिर्याद आहे.

**समक्ष**

स्मिता नवघरे
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
जळगांव

**ही फिर्याद दिली**
**दि.०७.०१.२०२५**

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी.जळगाव

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0014 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/01/2025 00:04

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 07/01/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 07/01/2025
**Time From (वेळेपासून):** 16:55 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 07/01/2025 **Time (वेळ):** 23:59 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 044
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/01/2025 23:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कुसुंबा खुर्द तलाठी कार्यालय ,जळगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुनिल नामदेव परदेशी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1999

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रायपुर ता जि जळगाव ,एम.आई.डी.सी,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रायपुर ता जि जळगाव ,एम.आई.डी.सी,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8208787138

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नितीन शेषशराव भोई | | | 1. प्रतिभा गॅस एॅजन्सी , कालिंकामाता मंदराजवळ जळगाव,एम.आई.डी.सी, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यातील तक्रारदार यांना मौजे रायपुर जि जळगाव येथील भुखंड नं 52 चे एकुण क्षेत्र 3.41.60 चौ मि चे 7/12 उताऱ्यावर स्लॉप रजीस्टर प्रमाणे त्यांचे आई वडील व भाऊ अनिल याचे नाव लावुन पाहीचे होते. त्याबाबत तक्रारदार यांनी त्यांचा चुलत भाऊ मनोज परदेशी रा रायपुर ता जि जळगाव यांच्यासह कुसुंबा खुर्द गावाचे तलाठी कार्यालयात जावुन आलोसे यांची भेट घेवुन कागदपत्र दिली होती तेव्हा आलोसे यांनी सदरचे काम करून देण्याचे मोबदल्यास तक्रारदार यांच्याकडे 5000/-रूपये लाच रकमेची यांनी मागणी केली होती त्याबाबत फिर्यादी यांनी ला प्र वि जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहून दिली होती.

सदर लाच मागणी तक्रारीची दि.07/01/2025 रोजी पंचासमक्ष प्रथम लाच मागणी पळताळणी आलोसे यांना तक्रारदार यांच्याकामासंदर्भातील विषय समजला नाही म्हणुन त्यांनी तक्रारदारास भुसंपादन अधिकारी पुर्नवसन शाखा यांच्याकडे जा असे सांगितल्याने तक्रारदार तेथुन निघून आले होते त्यानंतर तक्रारदार यांचे सांगणे प्रमाणे त्यांचा चुलत भाऊ मनोज परदेशी रा रायपुर ता जि जळगाव यांच्यासोबत लाच मागणी पळताळणीसाठी पाठविले असता आलोसे यांनी मौजे रायपुर येथुन भुखंड नं 52 चे एकुण क्षेत्र 3.41.60 चौ मि चे 7/12 उताऱ्यावर स्लॉप रजीस्टर प्रमाणे तक्रादार यांनी आई वडील व भाऊ अनिल यांचे नाव लावुन देण्याचे मोबदल्यास प्रथम 5000/- रू व तडजोडी अंती 3000/- रूपये लाच रकमेची मागणी करून तडजोडी अंती 3000/- रूपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले व सदर लाच रक्कम आज दि07/01/2025 रोजी 16.55 वाजेच्या सुमारास कुसुंबा खुर्द तलाठी कार्यालयाबाहेर पंचासमक्ष स्वताहा स्विकारली म्हणुन गुन्हा सोबत टंकलिखीत केलेली फिर्याद जोडली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
sandip bhatu patil(I (Inspector)) / DGPSBPM8108 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**No.(क्र.):**

**Rank (पद):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

सही
(अधिकार पाटील)
पोलीस ठाणे अंमलदार 792

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** sandip bhatu patil
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPSBPM8108